VP 0078

पर्यावरणीय दृष्टी : आशय व आकार

– वसंत पळशीकर

पर्यावरणीय दृष्टीचा स्पर्श झालेले, ती दृष्टी बाळगून दिले जाणारे शिक्षण कोणत्या ठळक बाबतीत वेगळे असेल या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी 'पर्यावरणीय दृष्टी'चा आशय व आकार निश्चित मनासमोर असणे आवश्यक आहे. या आशय व आकाराची सुस्पष्ट मांडणी करणारा व प्रचलित शिक्षणपद्धती आणि 'पर्यावरणीय दृष्टी' या दोहोतील संबंधाचा उलगडा करून देणारा हा लेख.

पर्यावरणाविषयी आत्मीयता, जाण व क्रियाशील आस्था निर्माण करणे हे शैक्षणिक उद्दिष्ट म्हणून आज स्वीकारले गेले आहे. पृथ्वीच्या पर्यावरणाची उत्पादकता, स्वास्थ्य व संतुलन कायम राखता आले तरच मानवजातीचे भवितव्य सुरक्षित व निश्चिंत राहील याचे भान जगातील शासनांनाही आज प्रकर्षाने झाले आहे, हे याचे कारण आहे.

अनेक विषयांपैकी एक विषय म्हणून 'पर्यावरण' हा विषय अभ्यासक्रमात प्रविष्ट केला जात आहे. जोडीला, भूगोल, विज्ञान अशा काही विषयांच्या अभ्यासक्रमात एक घटक म्हणून पर्यावरणाचा समावेश केला जातो.

पर्यावरणीय दृष्टीचा स्पर्श झालेले, ती दृष्टी बाळगून दिले जाणारे शिक्षण कोणत्या ठळक बाबतीत वेगळे असेल? या प्रश्नाचे उत्तर देण्याआधी 'पर्यावरणीय दृष्टी'चा आशय व आकार निश्चित मनासमोर असणे आवश्यक आहे. प्रस्तुत लेखामध्ये 'पर्यावरणीय दृष्टी' म्हणजे काय हे स्पष्ट करून, शिक्षण प्रक्रियेशी ती कशी जोडून घेता येईल किंवा शिक्षणप्रक्रिया तिने कशी संस्कारित केली जाऊ शकेल याचे सूचन करण्याचे योजिले आहे.

– १ –

पर्यावरण विज्ञान – इकॉलॉजी, परिस्थितिकी विज्ञान - ही विज्ञानाची एक शाखा आहे. पर्यावरणीय दृष्टीचे समीकरण आपण पर्यावरण विज्ञानाशी घालता कामा नये. मानवी व्यक्तित्व व जीवन, समाजाची व्यवस्था व व्यवहार यांच्या संदर्भात गोष्टी कशा असणे चांगले, इष्ट, श्रेयस्कर व आदर्श यांविषयी आपली काही धारणा असते, आपण निवड करतो, काही निर्णय आपण घेतो. दृष्टीचा संबंध या गोष्टींशी असतो, तर विज्ञान नैसर्गिक घडामोडींचा, वस्तूंच्या स्वरूपांचा – त्यांची मूलतत्त्वात्मक जडणघडण, त्यांच्या क्रिया-प्रतिक्रियांचे आधारभूत नियम, कार्यकारण संबंध यांचा – अभ्यास करून फलिते आपल्यासमोर ठेवते. हे वैज्ञानिक ज्ञान मोठे शक्तिशाली असते. आधुनिक काळातील तंत्रवैज्ञानिक कामगिरीमुळे या ज्ञानात दडलेली प्रचंड शक्ती आपल्या सर्वांच्या अनुभवास रोज येत आहे. पण या ज्ञानामधून जीवन जगण्याविषयीची दृष्टी प्राप्त होत नाही. पर्यावरणज्ञान म्हणजे सजीव-निर्जीव, दोन्ही प्रकारच्या निसर्गसृष्टीसंबंधी प्राप्त झालेले वैज्ञानिक ज्ञान होय. पर्यावरणीय दृष्टी अद्ययावत वैज्ञानिक ज्ञानाच्या आधारे सखोल, प्रगल्भ व नेमकी करीत राहायला लागेल, ही गोष्टही खरी. पण पर्यावरणीय दृष्टी ही एक स्वतंत्र गोष्ट आहे हे पक्के ध्यानात ठेवावयास हवे.

वैज्ञानिक ज्ञानाची पर्यावरणीय दृष्टी ही निष्पत्ती नसेल तर मग पर्यावरणीय दृष्टीचा आधार कोणता? तिचे सत्यत्व व प्रामाण्य व सार्विकता कशाच्या आधारे सिद्ध होतात? आजच्या विज्ञानयुगात, किंवा अधिक नेमकेपणाने म्हणावयाचे तर विज्ञानयुगाच्या आधुनिक युगोत्तर टप्प्यावर (पोस्ट-मॉडर्न), वैज्ञानिक ज्ञानाचे क्षेत्र सोडल्यास, अन्य सर्व प्रकारचे 'ज्ञान' हे 'ज्याचे त्याचे मत' या स्वरूपाचे ठरविले गेले आहे; मला/आम्हाला असे दिसते, भावते वा मी/आम्ही असे बघतो/पाहतो, समजतो याच प्रकारचे विधान करता येते. सर्वांसाठी एकच आहे वा अर्थाने सार्वकालिक सत्य व प्रमाण असे ते ज्ञान नसते. पर्यावरणीय दृष्टी या अर्थाने व्यक्ती वा गट विशिष्ट असते; ज ती बाळगतात, स्वीकारतात त्यांच्यापुरते तिचे सत्यत्व व प्रामाण्य असते असे प्रस्तुत लेखकाचे मत नाही. मानवमात्रासाठी जी सत्य व प्रमाण आहे, जी स्थलकाल तसेच व्यक्ती वा समूह विशिष्ट नाही अशी पर्यावरणीय दृष्टी आहे. मानवाला मानव म्हणून येणारा आत्मप्रत्यय हे तिचे अधिष्ठान आहे.

कशाचा हा प्रत्यय असतो? साररूपाने म्हणावयाचे तर हा माणसाचा व्यक्ती व समूह म्हणून इतरांशी असलेल्या नित्य व अचल नात्याचा प्रत्यय असतो. 'पंचमहाभूतां'नी बनलेले विश्व, निसर्गसृष्टी, जीवसृष्टी, इतर



माणसे ही माझी अगदी आत्मीय अशी सगीसोयरी आहेत, नव्हे ती माझ्यात आहेत व मी त्यांच्यात आहे, हा प्रत्यय. रंगरूप, भाषा, धर्म, निवास, ज्ञान, कौशल्य, क्षमता, कर्तृत्व अशा सर्व गोष्टींवरून पडणाऱ्या भेदांच्या पलीकडे पोचणारे-असणारे 'माणूसपण' मानव प्राणिजातीत जन्माला येणाऱ्या प्रत्येक मानवात असते, आणि 'आपण सर्व मानव आहोत' हे नित्य व अचल सत्य आहे, यांचा पण प्रत्यय.

– २ –

पर्यावरणाचा ऱ्हास, त्याचे असंतुलन, प्रदूषण हे शब्दप्रयोग अलीकडे सतत कानावर पडतात, वाचण्यात येतात. आर्थिक-औद्योगिक विकासाच्या प्रक्रियेमधून, आधुनिक काळातील उपभोगप्रधान जीवनाच्या वाढत्या आघातामुळे, म्हणजेच अमाप/अनिर्बंध मानवी हस्तक्षेपामुळे पर्यावरण बिघडत आहे, प्रदूषित होत आहे, असंतुलित बनत आहे याविषयी बऱ्यापैकी सर्वमान्यता आहे.

मानवमात्रासाठी जी सत्य व प्रमाण आहे, जी स्थलकाल तसेच व्यक्ती वा समूह – विशिष्ट नाही अशी पर्यावरणीय दृष्टी आहे. मानवाला मानव म्हणून येणारा आत्मप्रत्यय हे तिचे अधिष्ठान आहे.

स्वस्थ, संतुलित, प्रदूषणमुक्त, आरोग्यदायी, संपन्न व सुंदर पर्यावरणाचे काहीएक चित्र आपल्या डोळ्यांसमोर असते. मानवी क्रियाकलापांमुळे बिघाड, ऱ्हास या गोष्टी घडत असतील तर माणसाचे वागणे अयोग्य, अनिष्ट होत आहे असेही सूचन मिळते. **माणसाचा पर्यावरणाशी असलेला संबंध, आणि पर्यावरणाचे स्वास्थ्य संतुलन व संपन्नता न बिघडविण्याची माणसाची जबाबदारी हे दोन मुद्दे पर्यावरणीय दृष्टीच्या गाभ्याशी आहेत.**

'पर्यावरण' म्हणजे काय? पर्यावरण म्हणजे आपल्या जीवनाशी ज्यांचा संबंध पोचतो अशा सभोवतालच्या साऱ्या गोष्टी, असे साधे उत्तर देता येईल. आपणापैकी प्रत्येक जण एक ना एका स्थानिक परिसरात राहतो. मग ती व्यक्ती शहरात राहणारी असो वा खेड्यात. पण, त्याच वेळी, तिच्या स्थानिक परिसराबाहेरील परिसरात घडणाऱ्या घडामोडींचाही तिच्या जीवनावर आघात होत असतो. विज्ञानाने आज आपणांस हे ज्ञान करून दिले आहे की, अनेक बाबतींत पृथ्वीच्या पाठीवर कोठेही काही घडते तेव्हा ते आपल्यापर्यंत येऊन भिडतेच. तसेच, विश्वाच्या अनंत पसाऱ्यामध्ये, जीवसृष्टीची धारणा व विकास करण्याची अद्‌भुत क्षमता असलेले ग्रह अपवादभूत आहेत; अशा अपवादभूत जागांपैकी आपली पृथ्वी ही एक जागा आहे, हे भानही विज्ञानाने आपल्या ठायी उत्पन्न केले आहे.

पृथ्वीच्या जीवनधारणक्षमतेची अपूर्वाई, जीवसृष्टीचे अलौकिक वैविध्य, तिच्यातली गुंतागुंत, तिची होत आलेली उत्क्रांती, तिच्यातील अंगभूत सुव्यवस्था व नियमबद्धता, आणि त्या पलीकडे पोचणारी नवनवोन्मेषशालीनता या सर्वांविषयी मनात 'हे सारे किती अद्‌भुत, अलौकिक आहे' हा भाव पण पर्यावरणीय दृष्टीच्या गाभ्याशी आहे. या साऱ्याची निर्मिती, त्याचे प्रयोजन, त्याचे अंतिम लक्ष्य इत्यादी गोष्टी माणसाला अज्ञात राहतात; माणसाच्या बुद्धीला, मनाला हे गूढ उकलत नाही. चराचर सृष्टीविषयी पूज्यभाव, सृष्टीसमोर विनम्रता, विशेषतः सर्व जीवसृष्टीत (माणूस धरून) अभिव्यक्त होणाऱ्या जीवनतत्त्वाविषयी पूज्यभाव (अल्बर्ट श्वायट्झर यांच्या भाषेत 'रेव्हरन्स फॉर लाईफ') याही गोष्टी पर्यावरणीय दृष्टीच्या गाभ्याशी आहेत.

अंतराळामधून एका दृष्टिक्षेपात माणसाने अलीकडेच पृथ्वी पाहिली. पण पृथ्वी म्हणा, ग्रह-ताऱ्यांचे विश्व म्हणा, पंचमहाभूतांच्या स्वरूपातले विश्व म्हणा, माणसाने विश्वाशी, पृथ्वीशी विलक्षण खोलवर पोचणारे, त्याच वेळी सर्व गोष्टींना कवेत घेणारे असे आत्मीय नाते प्राचीन काळापासून अनुभवले आहे. इंद्रियगोचर सत्यापेक्षा अधिक सत्य म्हणून. त्याच प्रमाणे एका पातळीवर ही सर्व सृष्टी एकाच तत्त्वाचा वा शक्तीचा आविष्कार असल्याचे अनुभवले आहे. सर्व प्रकारच्या भेदांपलीकडे पोचणारे एकत्व व सहोदरत्व अनुभवले आहे. हा भेदविलोपनाचा साक्षात अनुभव फार थोड्यांना येतो, पण त्याचे खरेपण सामान्यजनांनाही, भावना व विचार या दोन्ही पातळ्यांवर पटत आले आहे.

चराचर सृष्टीपासूनचे स्वतःचे वेगळेपण हा माणसाचा नित्याचा लौकिक अनुभव आहे. ते वैशिष्टपूर्ण वेगळेपण, काही बाबतीत तर श्रेष्ठत्वही, न नाकारताना, एकत्व-सहोदरत्वाची ही अ-लौकिक, अनुभूती ही पर्यावरणीय दृष्टीच्या अशीच गाभ्याशी आहे.

– ३ –

जेम्स लवलॉक या वैज्ञानिकांनी पृथ्वीच्या जीवनधारणक्षमतेचा अभ्यास करून केलेली मांडणी प्रसिद्ध आहे. जीवनाची धारणा करीत राहणे हे पृथ्वी स्वतःचे कार्य मानीत असावी, व हा हेतू मनात ठेवून तिची रचना तिने केली असावी; म्हणजेच, पृथ्वी, तिच्या समग्र स्वरूपात, एक सचेतन शक्ती म्हणून हेतुपूर्वक काम करीत आहे असे त्यांना आढळले. परस्परांमध्ये गुंफण असलेली अनेकानेक 'चक्रे' बंद न पडता फिरत राहण्यावर, अनेक नाजुक, गुंतागुंतीचे तोल न ढळण्यावर पृथ्वीची जीवनधारणक्षमता, तिची सर्जक शक्ती अवलंबून आहे हे तथ्य पर्यावरण विज्ञान उत्तरोत्तर अधिकाअधिक स्पष्ट करीत आहे.

पृथ्वीच्या या कार्यात आज कोण विक्षेप आणीत असेल तर माणूस. मानवजात ही पृथ्वीचीच निर्मिती आहे. ईश्वर ही शक्ती व तिची इच्छा या गोष्टी अमान्य करणाऱ्यांनाही, मानवाचा अवतार जीवसृष्टीच्या उत्क्रांतीच्या ओघात घडून आला याचे श्रेय माणूस घेऊ शकत नाही हे मान्य आहे. माणसाच्या ठायी जी विश्लेषक-शोधक बुद्धी आहे, कल्पनाशक्ती आहे, उपयोजनाची क्षमता आहे तिच्यामधून 'विज्ञान-तंत्रविज्ञान' नावाचे कल्पनातीत ताकद असलेले हत्यार मानवजातीच्या हाती आले आहे. हे हत्यार वापरून माणूस पृथ्वीवरील द्रव्ये वापरून एक पूर्णपणे मानवी प्रतिसृष्टी निर्माण करण्याची क्षमता बाळगतो. ही क्षमता ध्यानात घेऊन, अनेक वर्षांवूर्वी एडमंड लीच नावाच्या मानवसमाज व संस्कृतींच्या प्रख्यात अभ्यासकांनी, 'आज माणूस ईश्वराच्या जागी स्वतःची प्रतिष्ठापना करीत आहे' ('मेन हॅव बिकम लाइक गॉड्स') असे उद्‌गार काढले होते.

वरील दोन्ही तथ्यांचा पर्यावरणीय दृष्टीमध्ये स्वीकार आहे. या स्वीकारामधून कोणता बोध आपण घ्यावा? स्वतःच्या वैज्ञानिक ज्ञान व तंत्रवैज्ञानिक शक्ती यांचा सर्जक आविष्कार मनमानी स्वरूपात माणसाने करता कामा नये; पृथ्वीच्या संदर्भात त्याचे आता एक नैतिक कर्तव्य आहे आणि ते कर्तव्य पार पाडण्याची जबाबदारीपण त्याची आहे, हे सत्य पर्यावरणीय दृष्टी सांगते, आग्रहपूर्वक सांगते.

> पृथ्वीच्या जीवनधारणक्षमतेची अपूर्वाई, जीवसृष्टीचे अलौकिक वैविध्य, तिच्यातली गुंतागुंत, तिची होत आलेली उत्क्रांती, तिच्यातील अंगभूत सुव्यवस्था व नियमबद्धता, आणि त्या पलीकडे पोचणारी नवनवोन्मेषशालीनता या सर्वाविषयी मनात 'हे सारे किती अद्‌भुत, अलौकिक आहे' हा भाव पण पर्यावरणीय दृष्टीच्या गाभ्याशी आहे.

व्यक्तीला किंवा समूहाला स्वतःच्या क्षमतेचे व ताकदीचे भान येते, आपल्या कर्तृत्वाचा प्रत्यय येतो तेव्हा त्याच्या ठायी गर्व उत्पन्न होण्याचा धोका असतो. त्याचे वागणे उद्दाम, मनमानी होण्याचा संभव वाढतो. त्याची आकांक्षा व लालसा अमर्याद बनण्याची शक्यता असते. असे घडणे आपण आजवर असंस्कृतपणाचे द्योतक मानीत आलो आहोत. ज्ञान, शक्ती, कर्तृत्व, क्षमता यांच्याबाबतीत इतरांच्या पेक्षा आपण सरस आहोत, विशेष आहोत हे लक्षात आल्यावर जो माणूस वा समूह अधिक शालीन, नम्र, (इतरांविषयी) आस्थेवाईक व कर्तव्यदक्ष बनतो, इतरांच्या उपयोगी पडण्याच्या भूमिकेवर स्थिर होतो तितका तो माणूस वा समूह उन्नत व सुसंस्कृत अशी व्याख्याच केली आहे.

पृथ्वीशी, चराचरसृष्टीशी आपले अत्यंत जवळिकीचे नाते लागते, ते माय-लेकराचे नाते आहे असे अर्थपूर्णरीत्या म्हणता येते, ही पर्यावरणीय दृष्टी असल्याचे आपण वर म्हटले आहेच. निसर्गसृष्टी आपले अनेक तऱ्हांनी पोषण करीत असते. शरीराचे तर पोषण करतेच. पण त्या पलीकडे 'माणूसपणा'चेही पोषण तिच्या आधारे आपण करीत असतो. दुर्दैवाने, आर्थिक विकास व भौतिक समृद्धीची आस, भौतिक जीवनमानात एकसारखी वाढ करण्याचे स्वप्न, तंत्रवैज्ञानिक करामतींची मोहिनी यांमुळे सृष्टीशी असलेल्या या अनेक पदरी, श्रीमंत नात्याचे भान लोपल्यासारखे होत आहे. पृथ्वीवर जे जे काही सजीव-निर्जीव म्हणून आहे ते ते केवळ एक संसाधन आहे, अशा संसाधनांचे कोठीघर म्हणजे पृथ्वी, अशी वृत्ती रुजली आहे.

विज्ञान-तंत्रविज्ञानाद्वारा माणसाला प्राप्त झालेली शक्ती, माणसाची प्रतिसृष्टी निर्माण करण्याची क्षमता, त्याची सर्जकता यांचा स्वीकार करीत असतानाच, या सगळ्यामुळे त्याची जबाबदारी अनेक पटींनी वाढते यावर पर्यावरणीय दृष्टी भर देते. पर्यावरणीय दृष्टी ही 'मानवकेंद्री' नाही; ती 'पृथ्वी/सृष्टीकेंद्री' आहे असे म्हणता येईल. आज माणसाची वृत्ती अशी आहे की, पृथ्वीवरील साऱ्या गोष्टींवर माणसाचे स्वामित्व आहेच आहे; त्याच्या उपभोगासाठी, आकांक्षांच्या पूर्तीसाठी सर्व गोष्टींचा हवा तसा वापर करण्याचा त्याला पूर्ण अधिकार आहे. ही वृत्ती आत्मघातकी गर्विष्ठपणाची, असंस्कृततेची द्योतक आहे असे पर्यावरणीय दृष्टी मानते.

पृथ्वीची जीवनधारणक्षमता अबाधित राखणे हे माणसाचे प्रथम कर्तव्य आणि प्राथमिक जबाबदारी आहे, ही गोष्ट तर झालीच. ही क्षमता संवर्धित करण्याचेही काम त्याला प्राप्त होत चाललेल्या वैज्ञानिक ज्ञानाच्या आधारे त्याला पार पाडावयाचे आहे. पण हे काम पार पाडीत असताना, सृष्टीशी असलेले एकत्वाचे व सहोदरत्वाचे नाते कायम राखण्याचे कर्तव्य त्याने दृष्टीआड करता कामा नये. अरण्ये, वाळवंटे, समुद्र, पर्वतराजी इत्यादी 'निर्जीव' प्राकृतिक रचना – यातल्या काही निर्जीव नाहीत हेही आपण जाणतो – माणसातल्या कलावंताचे, तत्त्वचिंतकाचे, साधकाचे, प्रतिभावंताचे पोषण करीत आल्या आहेत. जीवसृष्टीशी तर या प्रकारचे त्याचे नाते आहेच आहे. म्हणून, स्वतःच्या गरजा, आकांक्षा, स्वप्ने यांच्या पूर्ततेसाठी स्व-तंत्र भूमिकेमधून कृती करीत असताना माणसाने विनम्र व मर्यादशील राहावे, सृष्टीतल्या गोष्टींचा आदर करावा यावर पर्यावरणीय दृष्टी भर देते.

आजचे युग विज्ञानयुग आहे; वैज्ञानिक ज्ञानाच्या कक्षेत जे येत नाही त्याचे अस्तित्व नाकारले पाहिजे; कोणत्याही गोष्टीविषयी माणसाने पावित्र्याची भावना (द सेन्स ऑफ द सेक्रेड) बाळगणे हे अंधश्रद्ध असण्याचे लक्षण आहे; तेव्हा वैज्ञानिक-तंत्रवैज्ञानिक हस्तक्षेपाच्या आड येणारी लक्ष्मणरेषा अशी कोणतीच नाही, ही भूमिका पर्यावरणीय दृष्टी नाकारते. आजचे युग विज्ञानाचे युग जरूर आहे; पण जीवनदृष्टी कोणती अंगिकारावी ते विज्ञान सांगत नाही. काही गोष्टी पवित्र ठरवून, त्यांमध्ये हस्तक्षेप करणे पाप मानण्याला विज्ञानाचा विरोध नाही. माणसाला प्राप्त वैज्ञानिक-तंत्रवैज्ञानिक शक्तींची नोंद घेत असतानाच, अमूक-तमूक शक्तीचा वापर करून अमूक-तमूक हस्तक्षेप करण्याचा अधिकार माणसाला नाही, तसे करण्याने माणूस मर्यादेचे उल्लंघन करतो असे होईल, ही भूमिका विज्ञानविरोधी नाही. आजच्या जगात आपण अण्वस्त्र निर्मितीच्या व वापराच्या संदर्भात 'या वाटेने माणसाने जाऊ नये' असे व्यावहारिक कारणांसाठी ठरवू पाहत आहोतच.

– ४ –

आरंभी आपण असे पाहिले की, आर्थिक विकासाची आधुनिक प्रक्रिया आणि तंत्रविज्ञानाचा सर्वदूर व मूलगामी हस्तक्षेप या दोन्हींचे विपरीत परिणाम अनुभवल्यावर अलीकडच्या तीसपस्तीस वर्षांमध्ये पर्यावरणीय दृष्टी व विचारव्यूह यांची मांडणी पुढे आली. पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन ही जागतिक पातळीवरील एक गंभीर समस्या आहे याला १९७२ साली स्टॉकहोम (स्वीडन) येथे भरलेल्या जागतिक परिषदेत प्रथमतः ठळकपणे मान्यता मिळाली. १९९२ साली रिओ-द-जानेरो (ब्राझील) येथे भरलेल्या दुसऱ्या जागतिक परिषदेपर्यंत या समस्येने अधिकच उग्र रूप धारण केले होते. दीडशेहून जास्त राष्ट्रप्रमुख तिथे एकत्र आले होते. आर्थिक-औद्योगिक उत्पादनात सतत वाढ करीत असताना, तंत्रविज्ञानाचा वापर आणखी सर्वंकषरित्या करीत असतानाच याचा परिणाम म्हणून पृथ्वीची पर्यावरणीय व्यवस्था कोलमडणार नाही व माणसाचे अस्तित्वच धोक्यात येणार नाही याची काळजी घेतली पाहिजे, ही गोष्ट आज शिष्टमान्य झाली आहे.

या मर्यादेपर्यंत सर्वांची व्यापक अर्थाने एकवाक्यता असली तरी, आज दोन भिन्न विचारव्यूह आढळून येतात. यापैकी एक विचारव्यूह विज्ञान-तंत्रविज्ञानाच्या साहाय्याने अप्रतिहत स्वरूपात आर्थिक वाढ साधीत राहून, उपभोगाचे मान उंचावत नेत राहण्याच्या आधुनिक उद्दिष्टाला बांधील राहून पर्यावरणीय व्यवस्थेच्या संरक्षणाची काळजी घेण्यावर भर देतो. या विचारव्यूहानुसार, ही समस्या मुख्यत्वेकरून साधनस्रोतांच्या दूरदर्शी व समंजस वापराची व व्यवस्थापनाची समस्या आहे. आणि प्रगत विज्ञान व तंत्रविज्ञान यांच्या मदतीनेच तिची पूर्णपणे समाधानकारक सोडवणूक होणार आहे. भौतिक समृद्धीची, उच्च कोटीच्या सर्व प्रकारच्या उपभोगाची, श्रीमंती जीवनाची कांक्षा बाळगणे योग्यच आहे; ती कांक्षा पूर्ण करण्याची शक्ती विज्ञान-तंत्रविज्ञानाने माणसाला बहाल केली आहे व तिचा वापर केलाच पाहिजे; जैवतंत्रविद्या (बायो-टेक्नॉलॉजी), जनुकीय अभियांत्रिकी (जेनेटिक इंजिनिअरिंग), नवनव्या साधनस्रोतांचा शोध व जुन्या साधन स्रोतांचा नवनवा वापर, सौर ऊर्जा, अणूच्या पोटात दडलेली ऊर्जा व वनस्पतींमध्ये साठविलेली ऊर्जा यांचे कल्पकतेने रूपांतर करून आपल्या वापरासाठी ऊर्जेचे उदंड उत्पादन इत्यादी उपायांमुळे पर्यावरणीय समस्याच उत्पन्न होणार नाहीत आणि तरीही कल्पनातीत श्रीमंत जीवनसरणी सर्वांना प्राप्त होऊ शकेल असे आश्वासन मोठ्या ठामपणे हा विचारव्यूह देतो. तात्पर्य असे की, विकास-समृद्धी यांच्याविषयीच्या कल्पना, व्याख्या या विचारव्यूहामध्ये आजच्याच राहतात – विचारव्यूह विज्ञान-तंत्रविज्ञानवादीच आहे, आणि यात मानव हाच केंद्रस्थानी व सर्वेसर्वा आहे.

पर्यावरणीय दृष्टीची अशी अनुभवसिद्ध धारणा आहे की, विश्वामध्ये माणसाला एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे हे खरे; त्याच्या ठायी निर्मिकाची क्षमता व शक्ती आहे हेही खरे; पण म्हणून विश्वाच्या केंद्रस्थानी मानवाने स्वतःची प्रतिष्ठापना करणे, स्वतःचे वासना-विकार, कामना व कांक्षा यांनाच सगळ्या गोष्टींचा मानदंड व निकष मानणे हे आत्मवंचक घमेंडीचे द्योतक आहे. आपल्या बुद्धीच्या व आत्मकेंद्रितपणाच्या नशेत रममाण होत विनाशाला ते आमंत्रण देणारे आहे.

या लेखात विशद केलेल्या पर्यावरणीय दृष्टीमधून साकारणारा विचारव्यूह मानवाची निर्मिक ही भूमिका उचलून धरीत असतानाच माणसाने सांभाळावयाच्या मर्यादा कोणत्या, लक्ष्मणरेषा कोणती, पाळावयाची पथ्ये कोणती यांवर थर देण्याची गरज प्रतिपादन करतो. पृथ्वी/निसर्गसृष्टीचे स्वतंत्र, स्वायत्त अस्तित्व व स्वत्व यांचा अनादर होईल, तिचे अभंगत्व धोक्यात येईल असे वर्तन माणसाने करता कामा नये, या विषयी आग्रह बाळगतो.

सुखोपभोग, सत्ता, प्रतिष्ठा, मत्ता, यश, कीर्ती यांची लालसा ही आजच्या आर्थिक-सामाजिक-सांस्कृतिक व्यवस्थेला चालना व गती देणारी मध्यवर्ती बाब आहे; आधुनिक काळात आत्मकेंद्रियतेत रमलेल्या मानवाने या लालसेचे उदात्तीकरण केले आहे. तिला तात्त्विक साज चढविला आहे. 'ज्ञानाचा शोध' ही (क्वेस्ट फॉर नॉलेज) माणूस लालसेच्या पूर्तीसाठी घेतो आणि स्वातंत्र्याचाही अर्थ तो याच अंगाने लावतो. पर्यावरणाच्या असंतुलनाचे व ऱ्हासाचे मूळ अमर्याद लालसेतच आहे. म्हणून पर्यावरणीय दृष्टी लालसेतून मुक्त होण्यावर भर देतो. कारण लालसा स्वभावतःच मर्यादा जाणत नाही; पथ्ये सांभाळणे स्वीकारीत नाही.

– ५ –

माणसाचे माणूसपण कशात आहे? 'अमूक-तमूक मोठा विद्वान आहे, वा मोठा संशोधक आहे, वा कलावंत आहे, वा पैसेवाला आहे, वा सत्ताधीश आहे पण माणूस म्हणून तो छोटा आहे, खुजा आहे, वाईट आहे' असे आपण व्यवहारात, रोजच्या जीवनात एकमेकांना सांगतो. इतरांशी त्याचे संबंध कशा स्वरूपाचे आहेत, त्याची नैतिकदृष्ट्या गुणवत्ता काय आहे यावरून आपण कोणाचीही माणूस म्हणून उंची ठरवतो. ही गोष्ट समाज व संस्कृती यांनाही लागू आहे.

> स्वतःच्या वैज्ञानिक ज्ञान व तंत्रवैज्ञानिक शक्ती यांचा सर्जक आविष्कार मनमानी स्वरूपात माणसाने करता कामा नये; पृथ्वीच्या संदर्भात त्याचे आता एक नैतिक कर्तव्य आहे आणि ते कर्तव्य पार पाडण्याची जबाबदारीपण त्याची आहे, हे सत्य पर्यावरणीय दृष्टी सांगते.

आता, वरील शेरा जरा बारकाईने विचारात घेतला तर कोणता बोध निघतो? ज्ञान, कर्तबगारी, पैसा, सत्ता यांना मानवी जीवनात – व्यक्तिगत आणि सामाजिक, दोन्ही पातळ्यांवर – स्थान आहे, त्यांचा उपयोग आहे, आणि त्यांचे महत्त्वही आहे. पण माणूस म्हणून उंची गाठण्याच्या संदर्भात या साऱ्या गोष्टी सहाय्यभूत ठरतातच असे नाही. त्या अडसरही ठरू शकतात, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. या गोष्टींमुळे माणूस जर स्वयंकेंद्री, घमेंडखोर, स्वार्थी, अनुदार, लोभी, सत्तापिपासू, शोषक, कोरडा-रूक्ष बनला तर त्याच्या ठायीचे माणूसपण उणे होत जाते.

'माणुसकी' हा शब्द फार अर्थपूर्ण आहे. 'इतरां'शी 'स्व'चे संबंध कसे

असले की 'स्व'चे व्यक्तित्व माणुसकीसंपन्न होते व 'इतरां' सोबतचे जगणे अधिक मधुर होते? संबंध कसे असतात यामधून वातावरणाची निर्मिती होते. संबंध बिघडलेले असतात तेव्हा वातावरणात ताण, अशांतता, संशय, हिंस्रता, भय यांच्यात वाढ होते. अशा वातावरणात आपल्या आतही माणुसकीचा क्षय होतो आणि सामाजिक जीवनात तर पुष्कळदा माणुसकीचा बळी दिला जातो. ही आपल्या अनुभवाची गोष्ट आहे.

भौतिक जीवनमानाची उंची सतत वाढवीत नेणे हे जवळपास एकमेव ध्येय बाळगणाऱ्या आर्थिक विकासाला व समृद्धीला पर्यावरणीय दृष्टी महत्त्व देत नाही. व्यक्तिगत व सामाजिक जीवनाची नैतिक गुणवत्ता व उंची यांना पर्यावरणीय दृष्टी निर्णायक महत्त्व देते. माणसाचे निसर्गसृष्टीशी, इतर माणसांशी व स्वतःशीही जे संबंध असतात, जे आर्थिक-सामाजिक-राजकीय व्यवस्थेमधून व व्यवहारांमधून प्रकट/आविष्कृत होतात त्यामधून माणसे किती सुसंस्कृत व नैतिक ते ठरत असते.

— ६ —

पर्यावरणीय दृष्टीचे सत्यत्व विज्ञानाच्या रीतींनी सिद्ध होत नाही. विज्ञानाशी अविरोधी, संवादी पण ती एक दार्शनिक-आधिभौतिक दृष्टी आहे. हे दर्शन स्थलकालविशिष्ट नाही. समाज व संस्कृतीविशिष्ट नाही. ते विज्ञान-तंत्रविज्ञानाच्या अमूक इतक्या प्रगतीवर अवलंबून नाही. पर्यावरणीय दृष्टीच्या सत्यत्वाचा पडताळा माणसाला साक्षात् आत्मप्रत्ययाच्या स्वरूपात येतो. पर्यावरणीय दृष्टीची बौद्धिक-तात्त्विक मांडणी आज जशी आपण करतो तशी पूर्वीच्या काळी माणसांनी केली नसतो. आज आपण विज्ञान आणि सामाजिक शास्त्रे यांच्या जमान्यात राहतो आहोत. पण आदिम अवस्थेतील संस्कृती जगणाऱ्या माणसांच्या ठायीही पर्यावरणीय दृष्टीतले गाभ्याचे घटक आढळतात ही विशेष गोष्ट आहे.

आदिवासी समाज घेतले तर, स्थूलमानाने, आपण असे म्हणू शकतो की, आपल्या तुलनेत, त्यांना ज्या निसर्गसृष्टीत राहून आपले जीवन व्यतीत करावे लागते ती निसर्गसृष्टी वेगवेगळ्या अंगांनी जास्त 'प्रतिकूल' असते. नैसर्गिक आपत्तींना त्यांना वारंवार तोंड द्यावे लागते. निसर्गाचा लहरीपणा अनुभवावा लागतो. हिंस्र श्वापदांचा सामना करावा लागतो. मोठ्या कष्टाने त्यांना आपली उपजीविका हस्तगत करावी लागते. 'सुख' व 'दुःख' यांचे प्रमाण जर काढले तर, आपल्या आजच्या धारणेनुसार, त्यांना पुष्कळ अधिक दुःख पचवावे लागते.

या समाजांनी निसर्गसृष्टीशी स्वतःचे नाते कसे जोडून घेतले आहे ते पाहिले तर दोन गोष्टी प्रकर्षाने ध्यानात येतात. निसर्गातली, सृष्टीतली प्रत्येक सजीव-निर्जीव गोष्ट सचेतन आहे, तिच्या ठायी एक इच्छाशक्ती (वुइल), हेतूपूर्ण कृती करण्याची क्षमता व शक्ती आहे अशी त्यांची प्रचीती असते. शुभ-अशुभ असा भेद ते करतात. निसर्गातील ज्या गोष्टींचा त्यांच्या जीवनावर प्रतिकूल आघात होतो त्या गोष्टींपैकीही अनेक गोष्टींच्या विषयी धाक व पूज्यभाव ते बाळगतात.

आदिवासी समाजांचे अडाणीपण, त्यांचे तंत्रवैज्ञानिक मागासलेपण व दुबळेपण, कार्यकारणसंबंधांची उकल झालेली नसणे, भय इत्यादी कारणांनी या समाजांच्या धर्मांचा आशय ठरत असतो असे म्हटले जाते. या म्हणण्यातला तथ्यांश स्वीकारून आपण आणखी काही म्हणू शकतो. भौतिकदृष्ट्या खडतर, साधे जीवन जगणाऱ्या या आदिवासी माणसांमध्ये काही काळ राहण्याचा योग आला तर असे ध्यानात येते की, निसर्गसृष्टी-बरोबरचे नाते केवळ भयातून जोडलेले नसते. त्यांच्या साहित्यामधून, कलांमधून, सणउत्सवांमधून, त्यांच्या जीवनातल्या रोजच्या जगण्यामधून आत्मीयता, रसिकता, एकत्वाची अनुभूती इत्यादी विभिन्न वैशिष्ट्ये/पैलू त्यांच्या जगण्याचा भाग असल्याचे दिसून येते. दुसरी गोष्ट ध्यानात येते ती म्हणजे पर्यावरणाचा त्याच्या सर्व अनुकूल-प्रतिकूल वैशिष्ट्यांसह, आधारांसह स्वीकार. याचेही वर्णन पुष्कळदा 'दैववादी दृष्टिकोन' असे केले जाते. नशीब, दैव या संकल्पना वस्तुस्थितीच प्रकट करतात असे माणसांना पूर्वापार अनुभवास आले आहे. पण म्हणून आदिवासी माणसे वा संस्कृती कल्पकता, योजकता, प्रयत्न, कर्तृत्व यांना थारा देत नाहीत असे आढळत नाही. त्यांचा स्वीकारभाव अधिक खोलवर पोचणारा व अर्थपूर्ण असतो. समोर माणूस असो की निसर्गसृष्टी, समोरच्याचा आदर व सन्मानपूर्वक स्वीकार करण्यामधूनच विधायक, सकारात्मक संबंध, आत्मीयता, सहानुभाव प्रस्थापित होऊ शकतात.

> आज माणसाची वृत्ती अशी आहे की, पृथ्वीवरील साऱ्या गोष्टींवर माणसाचे स्वामित्व आहेच आहे; त्याच्या उपभोगासाठी, आकांक्षांच्या पूर्तीसाठी सर्व गोष्टींचा हवा तसा वापर करण्याचा त्याला पूर्ण अधिकार आहे. ही वृत्ती आत्मघातकी गर्विष्ठपणाची, असंस्कृततेची द्योतक आहे असे पर्यावरणीय दृष्टी मानते.

याची मांडणी वेगळ्या कोनामधून पुढीलप्रमाणेही करता येईल : आपल्या आसमंतातील गोष्टींशी आत्मीयतेचे, सहोदरत्वाचे, एकत्वाचे नाते जोडल्याखेरीज माणसाला राहवतच नाही. माणूस हा एक प्राणी असा आहे की ज्याला आत्मभान आहे व स्वतःला आत्मभानाची देणगी लाभल्याचेही भान आहे! त्यामुळे तो समूहशील प्राणी असूनही – समूहात जगत जगतच त्याला माणूसपण प्राप्त होऊ शकते – इतरांपासूनचे स्वतःचे वेगळेपण आग्रहपूर्वक प्रस्थापित करण्याचे काम अगदी लहान वयातही तो करीत असतो. स्वतःचे स्व-तंत्र, स्वायत्त व्यक्तित्व आवर्जून प्रस्थापित करीत असतो. हा त्याच्या मनुष्य स्वभावप्रकृतीचाच अंगभूत भाग आहे. तो गोष्टींना नावे देतो, त्यांचे वर्गीकरण करतो – म्हणजे भेद उत्पन्न करतो. भेदांच्या आधारे व्यवस्था लावतो व भेदपूर्ण व्यवस्थेला भाषेद्वारे टिकाऊ रूप देते. पण निसर्गसृष्टी, जीवन या गोष्टी सलग, अखंड आहेत; परस्परांशी जोडलेल्या, अन्योन्याश्रयी आहेत. भेद प्रस्थापित करणाऱ्या समूहापासून स्वतःला वेगळे करणाऱ्या माणसाला तुटलेपण चैन पडू देत नाही. भेदांचा विलोप ही त्याची आंतरिक अत्यावश्यक गरज असते. भेदांच्याही पलीकडे सृष्टीत जे एकत्व आहे, जे सर्वांचे सर्वांशी सहोदरत्वाचे आत्मीय नाते आहे ते अनुभवून, स्वीकारूनच त्याची ही गरज पूर्ण होऊ शकते.

– ७ –

आईच्या पोटात असलेल्या वेळेपासूनच बहुधा, पण जन्मानंतर तर खात्रीनेच, अनुप्राणित असलेल्या जीवाला वात्सल्यामधून केल्या जाणाऱ्या संगोपनाचा साक्षात प्रत्यय येतो. हे संगोपन त्याचा परिपोष करणारे असते हे त्याचे ज्ञान असते; हे सत्य, शिव व सुंदर असते. या संगोपनाचा एक भाग त्याच्या शारीर गरजा भागविण्याच्या अंगाने असतो. पोर तृप्त, समाधानी, स्वस्थ, प्रसन्न वगैरे असण्याचा त्याच्या शारीर गरजा भागण्याशी संबंध असतोच असतो. पण संगोपनाचा आणखीही एक भाग असतो. मायेच्या स्पर्शाची ऊब, त्याचे संरक्षण, स्पर्शाद्वारे होणारे कौतुक, त्यातून व अन्य मार्गांनी घडणारा संवाद या गोष्टी त्यात येतात. बालकाचे संगोपन नीट होणे व तो चांगला माणूस बनणे यांचा अतूट अंगभूत संबंध हा प्रत्येक माणसाच्या प्रत्ययाचा भाग आहे.

काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर या विकारांना माणसाने षड् रिपू मानले आहे. एका अंगाने हे विकार माणसाच्या व्यक्तिगत व सामाजिक, दोन्ही पातळ्यांवरील जगण्याच्या संदर्भात, 'टिकून राहण्या'च्या (सर्व्हायव्हल) संदर्भात आवश्यक आहेत हे आपणास कबूल करावे लागेल. पण मग सुसंस्कृतेच्या संदर्भात यांना षड् रिपू असे का म्हटले जाते? इतरांशी माणुसकीचे, म्हणजेच परस्परांच्या परिपोषाचे संबंध जोडण्याच्या, राखण्याच्या व वाढविण्याच्या आड येण्याचे वळण त्यांना प्राप्त व्हावे असा त्यांचा स्वभावतः कल असतो हा देखील माणसाचा आत्मप्रत्यय आहे. म्हणून त्यांच्यापासून सावध राहण्याला, विकारांना आवर घालायला, इंद्रियनिग्रह करण्याला महत्त्व देणे व्यक्ती व समाज दोहोंच्या कल्याणप्रद धारणेच्या साठी आवश्यक व इष्ट मानले गेले आहे.

पर्यावरणीय दृष्टीची अशी अनुभवसिद्ध धारणा आहे की, विश्वामध्ये माणसाला एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे हे खरे; त्याच्या ठायी निर्मिकाची क्षमता व शक्ती आहे हेही खरे; पण म्हणून विश्वाच्या केंद्रस्थानी मानवाने स्वतःची प्रतिष्ठापना करणे, स्वतःचे वासना-विकार, कामना व कांक्षा यांनाच सगळ्या गोष्टींचा मानदंड व निकष मानणे हे आत्मवंचक घमेंडीचे द्योतक आहे.

माणसाच्या बाबतीत कोणतीच गोष्ट, वर्तणूक वा कृती, आपोआप, यांत्रिकपणे एका 'आज्ञावली'नुसार घडत नाही. जन्माला येणारा जीव जर जगावयाचा व वाढावयाचा असेल तर त्याचे वात्सल्यपूर्वक संगोपन करणे जरूरीचे व हितावह आहे हे ज्ञान माणसाला अनुभवाने जाणून व संस्कारांनी आत्मसात करावे लागले असणार. वात्सल्यपूर्ण संगोपनासाठी कुटुंब ही संस्था उपकारक व आवश्यक आहे हेही ज्ञान त्याने असेच संपादन केले असणार.

स्वतःच्या वाटचालीच्या ओघात माणूस आज ज्या टप्प्यावर येऊन पोचला आहे त्या टप्प्यावर त्याने केवळ व्यक्ती, कुटुंब, गणगोत, जमात यांच्या धारणेच्या संदर्भात विचार करणे पुरेसे नाही. 'वसुधैव कुटुंबकम्' हे आजचे वास्तव लक्षात घेऊन स्वतःसह 'इतरां'चाही – यात निसर्गसृष्टी, पृथ्वी आली – परिपोष कशाने होईल याचा विचार करणे अगत्याचे बनले आहे.

अशा रीतीने, पर्यावरणीय दृष्टी माणसाचा आदिम काळापासून आजपावेतोचा जो नित्याचा प्रत्यय आहे त्यावर आधारलेली आहे. पर्यावरणीय दृष्टी 'इतरां'मध्ये संपूर्ण सृष्टीचा समावेश करून विचार करते. तिची तत्त्वे, मूल्ये, उद्दिष्टे सनातन आहेत.

– ८ –

पर्यावरणीय दृष्टिसंपन्न शिक्षणाची व्यवच्छेदक लक्षणे कोणती असतील? ठळक वेगळेपण पुढील काही बाबतींत असेल:

(१) इतर मुलांपासूनचे स्वतःचे वेगळेपण, स्वतःचे 'मी'पण, त्या 'मी'पणाचा इतर मुलांच्या 'मी'पणाशी सामना करीत स्वतःचे व्यक्तित्त्व व स्वतःचे स्वार्थ यांची जोपासना या गोष्टी एका पातळीवर उपजतच असतात, सांभाळल्या जातात. त्यांची गरजही स्पष्ट आहे. या गोष्टी ठसविण्यासाठी, त्यांची पुष्टी करण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागत नाहीत.

मुलाचे इतरांशी असलेले आत्मीय, सहोदरत्वाचे, सहानुभावाचे नाते, व अशा नात्यांमधून त्याच्या व्यक्तित्वाचा होणारा स्वास्थ्यपूर्ण विकास, लाभणारा आनंद व समाधान, व्यक्तित्व न हरवता समूहाशी एकरूपता पावून केलेल्या कृतींमधून मिळणारी अ-लौकिक, उन्नत एकत्वाची प्रचीती, या गोष्टींचा साक्षात् अनुभव देणारे वातावरण, सामूहिक रचना, शिक्षणपद्धती यांचा अंगीकार.

(२) पंचमहाभूते आणि जीवसृष्टी यांच्या निकट सान्निध्यात मुलांचे शिक्षण घडेल, मुले वाढतील यावर भर असेल. निसर्गात रमण्याची, निसर्गाशी 'संवाद' करण्याची संधी मिळत राहील ही दृष्टी असेल. वनस्पती व प्राणिसृष्टीशी माणसाचे अनेक पदरी गहिरे नाते आहे. त्या अनेक पदरी नात्यामधून माणसाचे अनेक अंगांनी पोषण होते, त्याला निर्मितीची प्रेरणा मिळते, 'स्व'च्या उन्नयनाचा अनुभव येतो, अ-लौकिकत्वाचा स्पर्श झाल्याचा वा त्या प्रांतात प्रवेश केल्याचा अनुभव येतो, याचा प्रत्यय मुलांना त्यांचा त्यांना येईल.

(३) स्वतःच्या (म्हणजेच मानवाच्या) जीवनाच्या धारणेसाठी, संपन्नतेसाठी, निश्चिततेसाठी आपण निसर्गसृष्टीतली अनेकानेक चक्रे व तोल यांच्यावर कसे अवलंबून आहोत, अन्योन्याश्रयी जैव नाती (सिम्बायोटिक) टिकवून धरणे कसे महत्त्वाचे आहे याची माहिती करून देण्यावर, त्यांची प्रचीती येऊन जाण उत्पन्न होईल यावर भर राहील.

या संदर्भात मानवाचे विशेष कर्तव्य, त्याची जबाबदारी यांचे भानही उत्पन्न करण्यावर भर असेल.

(४) माणसाने संपादित केलेले चोख, सूक्ष्म वैज्ञानिक ज्ञान, त्या आधारे उत्पन्न केलेल्या तंत्रविज्ञानाची अचाट शक्ती, मानवी प्रतिसृष्टी निर्माण करण्याच्या दिशेने केलेली नेत्रदीपक वाटचाल यांचा परिचय करून देत असतानाच, त्याविषयी रास्त आत्मगौरवाची भावना रुजवीत असतानाच, त्याच वेळी, या ज्ञानाच्या मर्यादा, तंत्रवैज्ञानिक उपयोजनाचे

वेळी सांभाळावयाची पथ्ये, घ्यावयाची खबरदारी, टाळावयाचे मोह यांचेही मुलांचे शिक्षण करण्यावर भर असेल.

(५) आपल्या उपयोग व उपभोगापुरतेच निसर्गातल्या सर्व गोष्टींचे मूल्य व स्थान आहे; जे उपयोगी नाही व उपद्रवकारक वाटते ते ते नष्ट करण्याचा जन्मसिद्ध अधिकार माणसाला आहे, ही वृत्ती न रुजावी याविषयीची जागरूकता. आपणास निरुपयोगी, उपद्रवी व क्षुद्र वाटणाऱ्या वनस्पती व प्राणी-कीटक-सूक्ष्मजीव जीवसृष्टीत स्वायत्तपणे अस्तित्वात आहेत, याचे प्रयोजन आपणांस अज्ञात आहे व अज्ञात राहणार याचे भान उत्पन्न करून जीवसृष्टीतल्या सर्व जातींविषयी समत्वबुद्धी व आदरभाव बाळगून व्यवहार करण्याची वृत्ती उत्पन्न करण्यावर भर.

> भौतिक जीवनमानाची उंची सतत वाढवीत नेणे हे जवळपास एकमेव ध्येय बाळगणाऱ्या आर्थिक विकासाला व समृद्धीला पर्यावरणीय दृष्टी महत्त्व देत नाही. व्यक्तिगत व सामाजिक जीवनाची नैतिक गुणवत्ता व उंची यांना पर्यावरणीय दृष्टी निर्णायक महत्त्व देते.

जगण्याच्या, टिकून राहण्याच्या ओघात 'जीवो जीवस्य जीवनम्' या न्यायाने व्यवहार होत असतानाही सहोदरत्वाचे नाते कसे अनुभवास येते, 'जगा व जगूही द्या' या तत्त्वाचे पालन कसे केले जाते, आणि पूज्यभाव कसा मनोमन बाळगला जातो व व्यवहारात प्रकट होतो याचा संस्कार करण्यावर भर.

(६) माणसाच्या श्रीमंतीचे, ऐश्वर्याचे, मोठेपणाचे, यशाचे मोजमाप पैसा, मालमत्ता, सत्ता यांच्यावरून होत नाही; माणसाच्या जीवनात, इतरांबरोबरच्या वागण्यात माणुसकीचा, नैतिकतेचा, सुसंस्कृततेचा आढळ किती होतो यावरून खरे तर मोजमाप होत असते, या सत्याचा संस्कार करण्यावर भर.

७) घरात, शाळेत व समाजात सहृदयता, औदार्य, क्षमाशीलता, बंधुभाव, न्यायबुद्धी, परोपकारी वृत्ती, सेवाभाव, कर्तव्याची पूर्ती यांच्या बैठकीवर परस्परांमधील संबंधांची बांधणी करण्यावर, व्यक्ति-समष्टी यांच्यात एक स्वस्थ समतोल प्रस्थापित करण्याचे महत्त्व ठसविण्यावर भर.

८) याचाच एक भाग म्हणून, स्वतःच्या आत डोकावून पाहण्याची, 'अहं'च्या पातळीपलीकडे असलेल्या 'अंतरात्म्या'च्या भूमिकेवर स्थिर होण्याची, त्या जागेवरून चराचर सृष्टीशी साक्षात् संवाद करण्याची क्षमता असलेले व्यक्तित्व घडविण्यावर भर.

शाळेतील शिक्षणाच्या संदर्भात विचार करावयाचा तर, विभिन्न विषयांचे विषयवार अभ्यासक्रम पार पाडण्याच्या प्रक्रियेस ही व्यवच्छेदक वैशिष्ट्ये कशी कशी जोडून घेता येतील, वा त्या प्रक्रियेत कशी अंतर्भूत करता येतील, हा प्रश्न पडेल. विषय व त्यांचे अभ्यासक्रम, ते अभ्यासक्रम पार पाडण्याच्या पद्धती व वापरावयाची साधने यांचीही काही वेगळी मांडणी करावी लागेल, ही गोष्ट स्पष्ट आहे. पण विशिष्ट विषय शिकविण्याच्या प्रक्रियेत एका मर्यादेपर्यंतच हे वैशिष्ट्यपूर्ण घटक समाविष्ट करता येऊ शकतील.

शाळेतील विद्यार्थी व शिक्षक मिळून बनणारा समुदाय (कम्युनिटी) व त्याचे सामुदायिक जीवन याचे महत्त्व या संदर्भात ध्यानात येते. विषयांचा अभ्यास करण्यासाठी अनेक गोष्टी वर्गात व वर्गाबाहेर मुले लहान-मोठे गट करून करतात. ज्यांना मुख्य ॲकॅडेमिक विषय म्हणून स्थान नाही पण शिक्षणाशी संलग्न असे विषय – उदा., चित्रकला, संगीत, खेळ, व्यायाम, कार्यानुभव इत्यादी – म्हणून ज्यांना काही स्थान आहे त्या विषयांशी संबंधित उपक्रम व कृती मुले सामूहिकरीत्या पार पाडतात. सर्व शाळेचे वा विभागांचे म्हणूनही काही उपक्रम असतात. या सर्व 'जागी' वरीलपैकी अनेक घटकांचा अंतर्भाव करणे शक्य, इष्ट व आवश्यक ठरते.

ही गोष्टही लक्षात येईल की, 'शिक्षण' कशाला म्हणावयाचे व शिक्षणाचे ध्येय काय यातही एक नवे वळण पर्यावरणीय दृष्टीवर आधारित शिक्षणात अध्याहृत व अभिप्रेत आहे. उदा., मुलांनी शाळेत वा घरी प्राणी पाळणे व त्या प्राण्याशी आत्मीय नाते जोडणे, झाडे लावणे व वाढविणे, जंगलात वा नदीकाठाने वा डोंगरामधून शांतपणे भटकणे, ऊन-वारा-पाऊस त्या त्या वेळी अंगावर घेणे, – अशा अनेकानेक गोष्टी आहेत की, ज्या शिक्षणाच्या संदर्भात विचारात घेतल्या जात नाहीत. आणखी एक उदाहरण द्यावयाचे तर योग, योगासने, विपश्यना या गोष्टींचे देता येईल. आज यांना मोठी प्रतिष्ठा व मान्यता प्राप्त झाली आहे. पण तणावपूर्ण व्यावसायिक, सामाजिक व कौटुंबिक जीवन जगाव्या लागणाऱ्या प्रौढांचे स्वास्थ्य व मनःशांती, क्षमतावृद्धी यादृष्टीने त्यांनी करावयाचे 'उपचार' म्हणून यांच्याकडे आज पाहिले जाते. व्यवसायात, कौटुंबिक जीवनाच्या सरणीत, शैलीत वा ध्येयांमध्ये काही मूलतः बदल करावा लागू नये यासाठी या उपचारावर भिस्त आढळते. एका वेगळ्या आध्यात्मिक पायावर व्यक्तित्वाची व जीवनाची जडणघडण करणारे शिक्षण करण्याच्या संदर्भात यांचे स्थान व महत्त्व अद्यापि मान्य झालेले नाही. आध्यात्मिक साधनेशी त्यांची जोड परंपरेने घातलेली असल्याने, या व प्रार्थना, ध्यानधारणा अशा गोष्टींचा शिक्षणात समावेश करण्यास विरोध होतो.

तात्पर्य, पर्यावरणीय दृष्टी शिक्षणात प्रविष्ट करावयाची तर शिक्षणाचा आशय, त्याची पद्धती, शिक्षणाची उद्दिष्टे या बाबतीत एका मूलगामी बदलाच्या वाटेवर प्रस्थान ठेवणे प्राप्त आहे.



Web of Life